# दक्षिण महाराष्ट्रातील शिलाहार राजवट

कु. वनिता गंपू कुंभार संशोधक विद्यार्थिनी इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ Email ID vanita.kumbhar@yahoo.com

---

**प्रस्तावना**

शिलाहार घराण्याच्या सहा शाखानी महाराष्ट्र आणि कर्नाटकातील काही प्रदेशावर राज्य केले. तो एक शाही वंश होता कि त्याने राष्ट्रकुटाच्या काळात उत्तर व दक्षिण कोकण आणि दक्षिण महाराष्ट्र म्हणजे कोल्हापूर येथे स्वताच्या वंशाची स्थापना केली. इसवी सन ८व्या शतकापासून ते १३व्या शतकापर्यंत अशी चार शतके त्यानी राज्य केले. शिलाहार राजे स्वताला महासामंत आणि नंतर महामंडलेश्वर तसेच तगरपूरवराधीश्वर असे बिरुद लावीत असत. त्या काळात त्यानी संस्कृत, मराठी, कन्नड या भाषांचा वापर केला. तसेच हिंदू आणि जैन धर्माचे पालन करून शिल्पकला आणि स्थापत्य कलेला वाव दिला. शिलाहारांच्या सहा शाखापैकी प्रमुख तीन शाखांची माहिती मिळते. शेवटी राष्ट्रकुट आणि यादव राजवंशानी शिलाहार साम्राज्यावर आक्रमणे केली आणि १३व्या शतकाअखेर हा वंश संपुष्टात आला.

**शिलाहार वंशाची तीन घराणी**

१) उत्तर कोकणचे शिलाहार

२) दक्षिण कोकणचे शिलाहार

३) कोल्हापूरचे शिलाहार [१]

**शिलाहार नामकरण (आख्यायिका)**

शिलाहार वंशाचा उल्लेख हा सीलार, शीलार, शियकार, शैलाकार अशा नावाने तत्कालीन लेखात आढळून येतो. त्यावरूनच शिलाहार हे नाव रूढ झाले. शिलाहार याचा अर्थ गरुडाकरिता 'शिलेवरील आहार' असा होतो. [२]

तर ही तिन्ही घराणी स्वताला विद्याधर जीमूतवाहन यांचे वंशज मानत होती. यात जीमूतवाहनाने एका नागाला वाचवण्याकरिता आपला देह एका दगडावर (शिलेवर) बसून गरूडाला अर्पण केला. म्हणून त्याच्या वंशाला शिलाहार (शिलेवरील गरूडाचा आहार) असे म्हटले गेले. [३]

**शिलाहारांचे मूळ ठिकाण**

शिलाहार राजे मूळचे कुठले असावेत याविषयी त्यांच्या शिलालेख आणि ताम्रपटावरून माहिती होऊ शकते. हे सत्ताधिश स्वताला 'तगरपूरपरमेश्वर' किंवा 'तगरपुरवराधीश्वर' या बिरूदांचा उल्लेख करतात. तसेच अजून काही लेखात आहतजीत, करहाटपुरवराधीश्वर, सीलार मार्तंड, सुवर्ण गरूडाध्वज अशा बिरूदांचा उल्लेख पहायला मिळतो.[४] तसेच उत्तर कोकण व कोल्हापूर या प्रदेशावर राज्य करणारे शिलाहार 'तगरपुरवराधीश्वर' असा आपला उल्लेख करतात. याचा अर्थ असा की, ते एकतर तगर नगरी मधले असावेत किंवा काही तेथे राज्य करीत असावेत. तगर म्हणजे मराठवाड्याच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील 'तेर' नावाचे प्राचीन स्थळ होय. प्राचीन काळापासूनच्या वस्तीचे अवशेष येथे प्राप्त झाले आहेत. [५]

**१) उत्तर कोकणचे शिलाहार**

राष्ट्रकुटांचे मांडलिक म्हणून उत्तर कोकणचे शिलाहार उदयास आले. या घराण्याचा मूळ म्हणून पहिला कपर्दी(८००-८२५) याने राष्ट्रकुटसम्राट तिसरा गोविंद याला उत्तर कोकणात राष्ट्रकुटांची सत्ता पसरविण्यात मदत केली असावी, म्हणून गोविंदाने तो प्रदेश जिंकल्यावर येथे मांडलिक म्हणून कपर्दीची नेमणूक केली. म्हणूनच उत्तर कोकणाला त्याच्या नावावरून 'कपर्दिद्वीप' किंवा 'कवडीद्वीप' असे म्हणत असत. [६]

या घराण्यांची राजधानी ठाणे ही असून त्यांची सरहद्द दक्षिणेत चिपळूण पर्यंत पसरलेली होती. या घराण्यांचा शेवटचा राजा सोमेश्वर होता. त्याच्या काळात देवगिरीच्या यादवांची सत्ता बलशाली होती. त्यामुळे यादव सत्ताधिश कृष्ण याने सुरूवातीस त्याचा पराभव केला होता. पुढे त्यांच्या नंतर सत्तेवर आलेल्या महादेवाने सोमेश्वराचा पूर्ण पाडाव केला आणि इ.स. १२६५ च्या सुमारास उत्तर कोकणातील शिलाहारांची राजवट संपुष्टात आली. [७]

या घराण्यांची वंशावळ पुढीलप्रमाणे...

- प्रथम कपर्दी (सु. सन ८००-८२५)
- पुल्लशक्ती (सु. ८२५-८५०)(ज्ञात वर्ष सन ८४३)
- द्वितीय कपर्दी (सु. ८५०-८८०)(ज्ञात वर्ष ८५१,८५७)
- वप्पुवन्न (सु. ८८०-९१०)

झंझ (सू. ९१०-९३०) गोग्गि(सु. ९३०-९४५)

प्रथम वज्जड (सु. ९४५) छद्वैदेव (सु. ९६५-९७५)

अपराजित (सु. ९७५-९९५) (ज्ञात वर्ष ९९३,९९७)

द्वितीय वज्जड (सु. १०१०-१०१५) अरिकेसरी (उर्फ प्रथम केशिदेव)
(सु. १०१५-१०२०) (ज्ञात वर्ष १०१७)

छित्तराज
(सु. १०२०-१०३५)
(ज्ञात वर्ष १०२४,१०२६
१०३४)

नागार्जून
(सु. १०३५-१०४५)
(ज्ञात वर्ष १०३९)

मुम्मुणि
(सु.१०४५-१०७०)
(ज्ञात वर्ष १०४९,१०५३
१०६१)

प्रथम अनंतदेव अथवा अनंतपाल (सु. १०७०-१११०)
( ज्ञात वर्ष १०८१,१०९५)

- अपरार्क उर्फ प्रथम अपरादित्य (सु. १११०-११४०)
(ज्ञात वर्ष ११२७,११३७,११३९)

विक्रमादित्य (सु. ११३८-?)
(ज्ञात वर्ष ११३९)

हरिपालदेव
(सु. ११३८-११५५)
(ज्ञात वर्ष ११४८,११४९,११५३,११५४)
मल्लिकार्जून (सु. ११५५-११७०)
(ज्ञात वर्ष ११५६, ११६२)
द्वितीय अपरादित्य (सु. ११७०-११९५)
(ज्ञात वर्ष ११८४, ११८५, ११८७)

द्वितीय अनंतदेव (सु. ११९५-१२००)
(ज्ञात वर्ष ११९८)

द्वितीय केशिराज (सु. १२००-१२४५)
(ज्ञात वर्ष १२०८, १२३९)
द्वितीय अनंतदेव
(सु. १२४५-१२५५)
(ज्ञात वर्ष १२५४)
सोमेश्वर (सु. १२५५-१२६५)
(ज्ञात वर्ष १२५९, १२६०)

**२) दक्षिण कोकणचे शिलाहार**

दक्षिण कोकणवर राष्ट्रकुट सत्ताधीश प्रथम कृष्ण याने आपले साम्राज्य प्रस्थापित केले. आणि या प्रदेशाचा प्रशासक म्हणून शिलाहार राजा सणफुल्लाची नेमणूक केली. दक्षिण कोकणच्या शिलाहारांचा हा मुळ पुरूष होय. दक्षिण कोकणवर दहा शिलाहार राजानी राज्य केले, पण उत्तर कोकण आणि कोल्हापूर या शाखेप्रमाणे या वंशाचे जास्त शिलालेख, ताम्रपट उपलब्ध नाहीत. या वंशाचा शेवटचा सत्ताधीश रट्टराजा हा होय. चालुक्य सत्ताधीश जयसिंग याने रट्टराजास ठार केले ते सन १०२४ च्या सुमारास आणि त्याबरोबरच या घराण्यांचा शेवट घडून आला. या शाखांची राजधानी खारेपारण होती. त्यांच्या ताब्यात रत्नागिरी आणि गोव्याचा काही प्रदेश होता. [९]

या घराण्यांची वंशावळ पुढीलप्रमाणे...

- सणफुल्ल (सु. सन ७६५-७८५)
- धम्मियर (सु. सन ७८५-८२०)
- ऐयपराज (सु. सन ८२०-८४५)
- प्रथम अवसर (सु. सन ८४५-८७०)
- आदित्य वर्मा (सु. सन ८७०-८९५)
- द्वितीय अवसर (सु. सन ८९५-९२०)
- इंद्रराज (सु. सन ९२०-९४५)
- भीम (सु. सन ९४५-९७०)
- तृतीय अवसर (सु. सन ९७०-९९५)(ज्ञात वर्ष ९८८)
- रट्टराज (सु. सन ९९५-१०२४)(ज्ञात वर्ष १००८-१०१०) [१०]

**३) कोल्हापूरचे शिलाहार**

कोल्हापूरचे शिलाहार हे सध्याच्या कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगाव इ. प्रदेशावर राज्य करीत होते. या घराण्यांची राजधानी ही वळीवडे (वळवडे), क्षुल्लुकपूर (कोल्हापूर), पद्मनाल (पन्हाळा) या ठिकाणी होती. कोल्हापूरचे शिलाहार हे स्वतंत्र सत्ताधीश होते. ते राष्ट्रकुटांचे मांडलिक नव्हते हे अनेक लेखावरून सिद्ध होते. या काळात राष्ट्रकुटांची सत्ता कमकुवत बनली आणि कोल्हापूर शिलाहार राजानी आपली सत्ता प्रस्थापित केली. या राजवटीत १४ सत्ताधीश झाले. या राजवटीचा मूळ पुरुष जातिग हा होता. तर शेवटचा सत्ताधीश दुसरा भोजराजा होय. त्यांच्या काळात दक्षिण महाराष्ट्रात विशेष करून कोल्हापूर प्रदेशात जैन धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झालेला दिसून येतो. [११]

- प्रथम जतिग (सु. सन ९४०-९६०)
- नायिवर्मन (सु. सन ९६०-९८०)
- चंद्र (सु. सन ९८०-१०००)
- द्वितीय जतिग (सु. सन १०००-१०२०)

↓

प्रथम गोंक (सु.सन १०२०-१०५०) | प्रथम गूवल | किर्तिराज | चंद्रादित्य

मारसिंह (सु.सन १०५०-१०७५)(ज्ञात वर्ष सन १०५८)

↓

द्वितीय गूवल (सु.सन १०७५-११००) | द्वितीय गोंक | बल्लाळ (सु. ११००-११०५) | प्रथम भोज (सु.सन ११०५-११४०) (ज्ञात वर्ष १११०,१११५,१११८,११२८,११३५) | गंडरादित्य

१) विजयादित्य(११४०-११७५) (ज्ञात वर्ष ११४३,११५३)

२) द्वितीय भोज (११७५-१२१२) (ज्ञात वर्ष ११७८,११८७,११९०,११९१,११९४)[१२]

**वैशिष्ट्ये**

१) शिलाहार राजवटीचा सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांकृतिक क्षेत्रातील झालेला विकास.
२) राजकीय स्थिरतेमुळे सामाजिक व आर्थिक समाजजीवनात झालेला अमुल्य बदल.
३) शिलाहारांच्या प्रादेशिक सत्तेत झालेली वाढ.
४) शिलाहारांच्या तिन्ही शाखांची शासनपद्धती ही राजसत्ताक असल्याने स्वतंत्र सत्तेची निर्मिती झाली.

**निष्कर्ष**

**१)** उत्तर व दक्षिण कोकणच्या शिलाहारानी राष्ट्रकुटांचे मांडलिकत्व स्विकारले पण कोल्हापूरातील शिलाहारांची सत्ता मात्र स्वतंत्र होती.
**२)** उत्तर कोकणच्या राजकीय सत्ता स्थिरतेमुळे तेथील वंशावळे खुप मोठी झाली.
**३)** दक्षिण महाराष्ट्रातील उत्तर कोकण, दक्षिण कोकण तसेच प्रामुख्याने कोल्हापूर भागातील शिलाहारांची राजकीय सत्ता प्रभावशाली बनली.

**संदर्भ**

१) https://www.wikipedia.org
२) सुतार ए.एम., चौगुले बी.ए., शिलाहार राजवट आणि जैनधर्म, अरूणा प्रकाशन, पृ.क्र.११
३) https://www.wikipedia.org
४) उपरोक्त पृ.क्र.१०, शिलाहार राजवट आणि जैनधर्म
५) https://www.wikipedia.org
६) मिराशी वि.वा., शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, विदर्भ संशोधन मंडळ, पृ.क्र.१७
7) उपरोक्त पृ.क्र.८, शिलाहार राजवट आणि जैनधर्म
८) उपरोक्त पृ.क्र.१८,१९,२०, शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख
९) कित्ता, पृ.क्र.९
१०) उपरोक्त पृ.क्र.४२, शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख
११) उपरोक्त पृ.क्र.९, शिलाहार राजवट आणि जैनधर्म
१२) उपरोक्त पृ.क्र.५०,५१, शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख